श्री

वासुदेव नारायण डोंगरेकृत

संगीत

वसंतोत्सव (प्रहसन.)

प्रयोगा करितां तयार केलें

तें

बेळगांव येथें


बेळगांव समाचार छापखान्यांत छापून
प्रसिद्ध केलें.

सन १८८७ इसवी.

रु. २

प्रस्तावना.

संगीत नाटक प्रयोगास संविधानक अगदीं सुलभ असल्या वाचून प्रेक्षकांचे मनरंजन होत नाहीं. अशी माझ्या लहान मोठया प्रेक्षकांनीं सूचना केल्या वरून हें लहानसे **वसंतोत्सव प्रहसन** प्रयोगा करितां तयार केलें आहे. या प्रहसनाचे संविधानक कल्पीत असून जगांतील साधारण लोकांच्या ब-या वाईट वर्तनाचा आराखडा आहे. व यांत हांस्य रसादि सर्व रसांची साधारण छाया आहे, असें ह्मटल्यास चालेल. पुस्तक वाचून नंतर याचा रंग भूमीवर प्रयोग पाहिला असतां विशेष मजा येईल असें वाटतें. असो या माझ्या कृतीला सर्व आबालवृद्ध आश्रय देतील अशी आशा आहे.



संगीत वसंतोत्सव प्रहसन.

अंक १ ला.

(पडद्यांत.)

पद (जिल्हा त्रिवट.)

स्वदेशप्रीति सुधारणेतें, त्द्दर्यि धरोनी अभिमानानें, हा मी निघालों, चला लुटाया विद्या यश धन भांडारातें ॥ धृ० ॥ आर्यावर्ती आर्य जननीच्या, पोटी जन्मुनीं उदरार्थाच्या पाठि-लागले भीति न त्यातें ॥ १ ॥ विविध प्रकारें उपदेशातें, करीतसें मी ऐकति श्रोते, परंतु नेणति या वर्मातें ॥ २ ॥

स्वदेशीय पुराणिक—(आपणाशीं) काय ह्मणतां? मी उपदेश करीत असतां कोणी ही वर्म जाणत नाहीं? हां हां! समजलों! खरोखर आपले हिताकडे दुर्लक्ष करून दुसऱ्याचें हित करणारे या जगांत थोडेच सांपडतील. आमच्या ह्या आर्यावर्त देशाची शोचनीय स्थिति पाहून मला फार वाईट वाटतें. आर्य जननीच्या पोटीं जन्मून आर्यबंधू आपल्या आईला विसरले हें किती भयंकर!! आपल्या देशाची सांप्रतची निकृष्टावस्था होण्याचें मूळ कारण हेंच होय. आह्मी परतंत्र झालों, आमची संपत्ती गेली, उद्योग धंदे बुडाले, सर्व लोक निरुद्योगी व भिकारी झाले,

नाना प्रकारच्या वाईट चाली आमच्या लोकांत शिरल्या इत्यादि कारणानींच ह्या देशाला दीनावस्था प्राप्त झाली असो. ही सर्व दुःखें दूर होऊन आपल्या देशाची सुधारणा व्हावी या हेतूनें, पाश्चिमात्य लोकानीं आमच्या हातांत दिलेली ही विद्याज्ञानकुठार मी हातीं घेतली आहे. याच कुठारीनें आर्यावर्त देशांतील अविद्यारण्याचा नाश करून टाकणार देश सुधारणेचीं कृत्यें माझ्या हातून जर घडलीं नाहींत तर आजपर्यंत पाश्चिमात्य लोकाशीं केलेला सहवास तसेंच त्यांची विद्या स्वीकारून पूर्वेकडील व उत्तरेकडील विद्येचा केलेला परिचय व्यर्थ गेला असें होईल. (इकडे तिकडे फिरून) आलीकडे आमचे देश बांधव माझ्या मतानुरूप वागू लागले आहेत हे पाहून माझ्या अगांतील वीरश्री ताजी झाली व मी जीं जीं देश सुधारणुकीचीं मोठ मोठीं कामें हातीं घेतलीं आहेत तीं सर्व निर्विघ्नपणे तडीस जातील असें ह्मणण्यास कांहींच हरकत नाहीं. आतां त्या पैकीं मुख्य काम हेंच राहिलें आहे कीं, आर्य देशांतील स्त्रिया व जुने पुराणे देवभोळे लोक जसेचे तसेच मूढमती राहिले आहेत त्यांस विद्वान करून व त्यांच्यांत सुधारणा करून बालविवाह कन्या विक्रयादि वाईट चालींचा नाश होऊन प्रीति विवाहाची चाल सुरू झाली कीं देश सुधारणे करितां धरलेल्या अवताराचें कृत्य संपलें असें होऊन इहपर धन्य व सुखी होईन. या साठीं स्वदेशीय पुराणिकाचा वेश

घेऊन ज्या ज्या ठिकाणीं जन समूह जमेल तेथें पुराण सांगण्याच्या मिषाने उपदेश करून आपला हेतु साधावा ह्मणजे झालें (मनन करून व आठवलेसें दाखवून) आजच माधवोद्यानांत वसंतोत्सव आहे तेथें च प्रथम श्रीगणेशायनमः करावा. (जातो.)

(वासंती, भद्रा, माधविका वगैरे नगर नारी वसंतोत्सवा करतां पूजा साहित्यासह माधवोद्यानांत येतात.)

पहिली—

पद (जिल्हा दीपचंदी.)

चल जाऊं चल सखि उपवन पाहूं ॥
वासंतिक सुख अनुभवूं ॥ १ ॥

दुसरी—

उपवनीं बहु विध सुमतरु फुलले ॥
ते पहाया जन ये स्थलिं जमले ॥ २ ॥

पहिली—

सुमन समय ऋतु वसंत बहारी ॥
वसंतोत्सव मनोहरीं ॥ ३ ॥

(सर्व स्त्रिया मदनाची पूजा करतात. नंतर स्वदेशीय पुराणिक पुराण सांगतो नंतर आरती ह्मणतात.)

आरती (पूर्वी त्रिवट.)

आरति रति पति मदनाची ॥ सुरमर्दन श्रीतनयाची ॥ धृ० ॥ तव जनि प्रिय जनमनभृंगा ॥ चोखिती रस करिती दंगा ॥ सर्ग स्थितिलय

कारणा ॥ रतिपति रमणा शरणागत त्यां भी-
ति नसे मरणाची ॥ १ ॥ वसंतोत्सव हा न-
वा ॥ सुखाचा ठेवा सतत असावा ॥ वाटे जी-
वा प्रिय ही माधवा, वानु किती मी थोरी या-
ची ॥ अहो या मीनकेतनाची ॥ २ ॥
(नंतर वसंत व त्याचा मित्र वसंतक हे येतात.)

वसंत—(आपणाशीं)

पद (पिलु जिल्हा दादरा.)

राजपथीं करित करित गमन कुतुहलें ॥
सौधस्थित सुंदरीस नयनीं देखिलें ॥ धृ०॥
चंचला कीं चपलाही येऊन बैसली ॥
चंद्रकला व्योमीं जणु स्थीर राहिली ॥
कोमलतनु हेमलता नार चमकली ॥
सुंदरीस पाहुनि मन मोह पावलें ॥ १ ॥

वसंतक—मित्रा वसंता अरे असें वेड्या सारखें काय क-रतोस! आज तुझें मन ठिकाणावर नाहीं असें वाटतें.

वसंत—(पुनः "राजपथीं" हें पद्य ह्मणतो.)

वसंतक— अरे बाबा तूं काय बडबडतोस त्याचा भावार्थ मला समजला; परंतु ज्या करतां तुझें मन इतकें बावरलें आहे ती कोण कोणाची हें तर सांगशील? मग त्याची कांहीं तरी व्यवस्था करतां येईल.

वसंत—(वसंतकाचे कानांत सांगतो.)

वसंतक—मोती चौकांत आमचे यजमान लोभाचार्य रा-

हतात त्यांची कन्या वासंती? आहे खरी. पण ती तुला मिळणार कशी? कारण तिचा बाप फार दुराग्रही आहे तेव्हां तुझें कुलशील कोणीकडे आणि भलतीच इच्छा तुला कोठून उत्पन्न झाली.

वसंत—तें कांहीं असो माझें एवढें काम तुला केलेंच पाहिजे. लोध्राचार्यांच्या घरचा तूं उपाध्याय आहेस ह्मणून तुला तें कांहीं कठीण नाहीं. या नाजुक कामाला चतुरस्रपणा, धूर्तता, मन मिळाऊपणा इत्यादि जे गुण लागतात ते तुझ्या अंगी साहजीक आहेत. मात्र तुझ्या मनानें ही गोष्ट घेतली कीं माझें काम झालेंच.

वसंतक—कांहीं चिंता नाहीं प्रयत्न माझा व नशीब तुझें. एवढें मात्र करकीं मी सांगेन त्या धोरणानें वर्तन ठेव. कारण लोध्राचार्यांशीं गांठ आहे. तेव्हां फार दक्षता ठेविली पाहिजे (जातो.)

वसंत—

पद (लावणी धुमाळी

मनामधीं भ्रम उपजवी कामिनी ॥ चंचल झाली
वृत्ति पाहिलें तिला तें पासुनीं ॥ धृ० ॥ कोण
निर्मिता नकळे हीचा कोण होईल धनी ॥ प्रे-
म दृष्टीची ग्रंथी पडली आम राहिली मनी ॥
काय करूं पराधीन ती मनोहारिणी ॥ कांहीं
सुचेना धैर्यही गेले गळोनीं ॥ १ ॥ (जातो)

(काकेंदु व ककुंधू हे येतात)

कर्कंधू–(मनांत) काय करावें काकेंदुला! हा तर फार दिवसापासून त्या लोभ्राचार्याच्या मुलीविषयीं लाळ घोटू लागला आहे आणि कालचा वसंतोत्सव पाहिल्या पासून तर बावरल्यासारखा झाला आहे याला कसें करावें?

कर्कंधू–

पद (मुलतानी धुमाळी.)

गृहधनदारा सुंदर असतां परगृहीं कशाला जातां ॥ वाईट कर्मे करितां हांसति जन करिती फजिता ॥ मूर्ख शिरोमणी तूं कैसा! हो साव ध कुणि नच दे पैसा ॥ अखेरी वाईट परिणाम चि ऐसा मग कोण कुणातें पुसता ॥ १ ॥

मित्रा काकेंदु तुला ही अवदसा कोठून आठवली!! परस्त्री लंपट होण्याची खोड सोडून दे! या पासून फायदा कायतो मार खाणें व वारंवार फजीत होणें दुसरें कांहीं नाहीं. माझें ऐक बाबा!! देवालयांत, पाणिवठयावर, लग्न कार्याचेवेळीं रस्त्यांत स्त्रियांचा समूह जमला कीं तुझी स्वारी तेथें लाळ घोटीत उभी असायचीच! या पासून फायदा कांहीं नाहीं. तुझी फजिती तर आहेच परंतु तुझ्या बरोबर जो कोणी जाईल त्याची ही फजीती होते.

काकेंदु–मित्रा कर्कंधू! हा तुझा तत्वविचार मी पुष्कळ वेळां ऐकला आहे! पुरे करा आपलें शहाणपण! जी गोष्ट तुझाला वाईट अशी वाटते तीच गोष्ट चांगली आहे अशी दुसऱ्याची खात्री होते या सिद्धां-

तावरून अकांड–ब्रह्मांडपर्यंत वाईट काय व चांगलें काय याचा निर्णय होणे कठीण. जगाचा न्याय हाच कीं सुचेल तें बोलावें! रुचेल तेंच व पचेल तें खावें! आणि वाटेल तसें करावें!

ककंधू–वाहावा!! महाराज! आतां आपण कमाल केलीत! नमस्कार (जाऊं लागतो)

काकेंदु–मित्रा तुला राग आला होय? अरे हा तुझा माझा नेहमीचा विनोद आहेच! हिकडे ये तुला मी एक गोष्ट सांगतो. तो आपला जुना खेळगडी कुंजपुऱ्यांत रहातो! अजून ध्यानांत आला नाहीं वाटतें? सावकार पुत्र वसंत त्याचा त्या थेरड्या लोभाचार्याच्या मुलीवर डोळा दिसतो.

ककंधू–बरें मग? तुझें त्यांत काय नुकसान आहे?

काकेंदु–नुकसान आहे तर; आमचे वडील असतांना त्यांचें व लोभाचार्याचें असे बोलणे झालें होतें कीं मी आपली मुलगी तुमच्या मुलाला देईन परंतु पुढें तो म्हातारा ती ओळख विसरला व पैशाचे आशेनें आपली मुलगी त्याणे तशीच ठेविली आहे. आतां कांहीं तरी अक्कल लढवून मी तिच्याशीं लग्न करणार समजलास!

ककंधू–अरे आतां त्या मागच्या गोष्टी कशाला काढतोस? तो म्हातारा लोभाचार्य द्रव्यलोभी आहे तेव्हां तो आपली मुलगी तुझ्यासारख्या वेड्या भिकाऱ्याला देईल असें स्वप्नांतसुद्धां आणू नकोस! बसा हाका मारीत झालें!!

काकेंदु–तुला जर गम्मत पाहायची असेल तर एक महिन्याचे आंत कसा काय तमाशा आहे तो तुला दाखवितों.

कर्कंधू–तें मी सर्व जाणून आहे! पण आपण युक्ति काय लढविणार तें तर कळूं द्या?

काकेंदु–पहिल्यानें तिच्या घरांत प्रवेश होण्यासाठीं कुडबुड्या जोशाचें सोंग घेऊन नुस्ती डोळेभरून पाहून येतों मग पुढचा विचार. (जातो.)

कर्कंधू–आमच्या स्वदेशीय पुराणीकानें गेल्या वसंतोत्सवाच्यावेळीं ज्या ज्या गोष्टी सांगितल्या त्या सर्वथैव खऱ्या आहेत. या देशांत आमच्या सारखे विद्वान जीवंत आहेत तों पर्यंत देश सुधारणेची आशा नाहीं.

पद (लावणी)

मूर्ख शिरोमणी काकेंदुची किती करूं मनधरणी ॥ गांव गुंड हा पुंड असे अती मनस्वी आणि मानी ॥ दुर्वर्तन हें जाचक होईल करिल जीवाची हानी ॥ नलगे मजला याची संगती मन गेलें त्रासुनी ॥ १ ॥ (जातो)

(माधविका वासंती वगैरे स्त्रिया घरांत बसल्या आहेत.)

मालती–अग माधविके तूं कांहीं गाणी नाहीं का शिकलीस? येत असलीं तर क्षण क्षणजे वेळतरी सुखानें जाईल.

माधविका–वासंती ह्मणेल तर मी ह्मणेन.

वासंती–मी नाहीं गडे ह्मणायची! तुझ्यासारखा माझा गळा कुठे चांगला आहे!! तूंच ह्मण ह्मणजे झालें!

माधविका–मला तरी काय गरज पडली आहे! माझा सुद्धां गळा चांगला नाहीं!

वासंती–पुरे बाई तुझी जेव्हां तेव्हां हीच रड! गळा चांगला आहे. गाणीं चांगली ह्मणतां येतात ह्मणून कोणी तरी ह्मणायला सांगते.

मालती—हेंग काय असें वासंते! भांडण पुरे आतां त्या माधविकेबरोबर गाणें ह्मणूं लाग.

वासंती–ह्मगतें, पण कोणतें गाणें ह्मणूं सांग?

मालती–दोघींना येत असेल तेंच ह्मणा ह्मणजे झालें.

(वासंती आणि माधविका गाणे ह्मणतात)

पद.

हा वसंत, सकला पमंत करि मन संत सुखावह बाई, पतिसंगा विरहित करूं मी काई ॥धृ०॥ स्त्री जात सकलही गात जगामधिं रमली; असें असुनी पुरुष मती कां भ्रमली ॥ संसृतीं सुखाची कृती स्त्री सुत सुतीं सदोदित गमली, असें असुनी कां अबलावरि छडि बसली ॥ गुमान बहु बेमान करी परवान अबला वल्ली, या दुःख भयें ही बहुताचिही झडली ॥ चाल ॥ परतंत्र पतिकारागृहीं किती लोळती ॥ बेडगळ्यांच्या पदरीं किती कुणी पडती ॥ या दुःखसा

गरीं किती बुडतीहो किती ॥ हें पाप करी संताप मनामधीं धाक सदोदित वाही, श्री वासुदेव नारायण पद पाही ॥ १ ॥ (इतक्यांत भद्रा येते.)

(इतक्यांत कार्केद कुडबुड्या जोशाचा वेश घेऊन येतो.)

भद्रा–अहो जोशीबोवा तुह्माला प्रश्न पहातां येतो का? येत असल्यास माझ्या मुलीला चांगला नवरा मिळेल कि नाहीं हें सांगा.

जोशी–व्हय बयासाव तुमच्या मुलीची जुनीपानी चोळी जुनीपानी साडी द्याल तर परश्न बघतो आन हा पिंगळा जोशी सांगनार तसें होणार बगा. अदोगर साडीचोळी माझ्या फड्यामदिं आणूनशान ठिवा या जोशी बुवासनी दुसरें कांहींबी नग.

भद्रा—मुली घरांत जाऊन जुनी साडी चोळी आणून याच्या पुढें ठेव.

(वासंती साडीचोळी आणून देते.)

जोशी—तुमच्या मुलीचे नाव काय? जराका माझ्या फुड्यामधीं बस बगूं.

भद्रा–हिचें नाव वासंती (मुलीला जोशीबुवापुढें बसावयास सांगते.)

(पातडें काढून गणीत करून जोशी खाणाखुणा सांगतो इतक्यांत भद्रेचा नवरा लोभाचार्य येतो. सर्व त्यास पाहून घाबरून उठतात.)

लोभाचार्य–मुली, अग वासंती कुठग आहेस? ती कुठे गेली? (जोशाकडे पाहून) अरे! हा कोण? कुडबुड्या जोशी! अरे गुलामा लुच्या? जातोस कीं नाहीं! ऊठ निघ येथून? चल जा. (त्याला मारण्याकरितां काठी उगारतो इतक्यांत तो तेथून पळून जातो.) (आपणाशीं) घरांत कोणी पुरुष नाहीं असें पाहून हे लुच्चे बायकानां फसवून त्यांच्यापासून कांहींतरी उपटून घेऊन जातात. आमच्या बायकोचा स्वभाव अगदीं भोळा आहे. कोणी कांहीं मागो, ना कधींच नाहीं. माझें लक्ष्य हिच्यावर आहे ह्मणून ठीक, नाहींतर ही घर धुवून टाकती! (रागानें) चला उठा! जा घरांत! चालल्या नाहो नाहींते ढंग कराय ला! कशाचेग प्रश्न पहाता? मूर्ख कोठच्या!) सर्व जातात.)

(नंतर वसंतक येतो.)

वसंतक—(आपणाशीं) माझा मित्र वसंत याचें काम तर लौकर झालें पाहिजे. तो लोभाचार्य आपल्या मुलीला बब्बुलाचार्यांच्या पदरांत घालणार. तेव्हां हें काम मोठें कठीण दिसते! लोभाचार्य मोठा नष्ट आहे. कसें होईल तें होवो. आतां एक उपाय आहे. लोभाचार्याची बायको भद्रा इच्याशीं खटपट केली असतां काम फत्ते होईल असें वाटतें. आणि अशीं नाजुक कामे बायकाच्या हातून सहज होत असतात. परंतु वसंताविषयीं वासंतीचे मन कसें काय आहे याचा खुलासा बारकाईनें केला पाहिजे. याला यु

क्ति काय बरें करावी? (चिंता केल्यासारखे करून) हां बरी युक्ती सुचली, उदयीक वसंतोत्सवा करतां वसंत माधवोद्यानांत येणार आहे त्यावेळीं वासंतीच्या तो सहज दृष्टीस पडेल. पहिले प्रयत्न या वसंतकाचा आणि नशीब त्या वसंताचें. असो आतां माधवोद्यानांत जावें (जातो.)

(इतक्यांत काकेंदु व कर्कंधू येतात.)

कर्कंधू–कां राव? झालें का काम? बहुतकरून मार खाऊन त्यारी हात हालवीत आलों असें वाटतें!!

काकेंदु—अरे बाबा अक्कलसे खुदा पछानना! मार खाण्याच्या गोष्टी राहूंद्या जें सोंग घेतलें त्याची बतावणी तर चांगली झाली! तुझी खात्री होत नसेल तर प्रत्यक्ष हें पहा. (लुगडें चोळी दाखवितो.)

कर्कंधू–शाबास! वाहावा! पण यांत फायदा काय?

काकेंदु यांतच कायतो फायदा आहे! अरे बाबा नवीन नवीन असलें ह्मणजे अशाच गोष्टी असतात.

पद (मालकंस–त्रिवट)

चंचु प्रवेशीं मुसल प्रवेशा, यत्न करावा धरोनी आशा ॥ धृ० ॥ इच्छा नच तरी यत्नाहि नलगे, यत्नी ईश कृपाही लागे ॥ तीच पुरविल आपुली मनीषा ॥ १ ॥

कर्कंधू—तूं अगदीं मूर्ख आहेस.

पद (मालकंस त्रिवट.)

वस्त्रपूत तरि उदका प्यावें ॥
न्याय पूतवच मुखीं असावें ॥ ध्रु० ॥
मनःपूत हो जगिं विचरावें ॥
स्वकीय लाभा जागृत रहावें ॥
कोणी कुणातें कुणि न पुसावें ॥ १ ॥ (जातात)

पहिला अंक समाप्त.

अंक २ रा.

(वासंती, भद्रा, माधविका वगैरे नगर नारी वसंतोत्सवा करितां माधवोद्यानांत येतात.)

वासंती—

पद (भूप त्रिवट.)

मदन सखा ऋतु वसंत नटला ॥
आनंदाचा सुदिन उगवला ॥ धृ० ॥

माधविका—

चंदन गिरी कंदरीं स्पंदती ॥
मंदा निलही वाहूं लागला ॥ १ ॥

वासंती—

पुष्पित तरुवरिं भृंग नाचति ॥
पीक ही सुस्वर करी गानाला ॥ २ ॥

माधविका—

कामिजनाचे भाग्य उदेलें ॥
भोगिति रति सुख वैभवाला ॥ ३ ॥

(वसंतक पूजा सांगतो, स्वदेशीय पुराणिक पूजा सांगतो. नंतर आरती होते. इतक्यांत वसंत येतो.)

वसंत—(आपणाशीं)

पद (बहार त्रिवट.)

कुंदलतांस अंकुर आले ॥ लोध्रद्रुमही पुष्पित झाले ॥ धृ० ॥ फुल्ल मालति वासंती किती ॥ नी-

ल वर्ण हे नीप डोलती ॥ भ्रमरभृंगकें भरूनि-
गेले ॥ १ ॥

पद (बागेसरी बहार त्रिवट)

आम्र तरूंच्या पंक्ति शोभति ॥ त्यातुनि को-
किल मंजुल बोलती ॥ नीप तरू तळि नर्तन
करिती ॥ मयूर आनंदें ॥ १ ॥

माझा मित्र वसंतक यानें सांगितल्याप्रमाणें या बागें-
त तर आलों पण तो अद्याप कां बरें आला नाहीं, (नि-
रखून) अरे हा वसंतक नगर स्त्रिया सह या माधवोद्या-
नांतच आहे. वा! वसंतोत्सवाची काय शोभा ही!!

पद (वसंत त्रिवट)

माधव वन किती सुंदर आहे ॥
मंद मंद ही वायु वाहे ॥ धृ० ॥
बकुल चंपक आम्र तरूवरी ॥
मधुकर गण मधुपाना तें करी ॥
निरुपम स्थलि ही उपमानोहे ॥ १ ॥

पद (परज सोहेनी त्रिवट.)

नर नारी जन समूह मिळाले ॥
सडा समार्जन करुनि बैसले ॥
वसंतोत्सव करूं पातले ॥
माधवोद्यानी ॥ १ ॥

पद् कालिंगडा त्रिवट.)

अशोक तरु तळीं नर नारी ॥
पूजिति दैवत शंकर रि ॥ धृ० ॥
आनंदोत्सव नृत्य गायना ॥
सुभगा प्रार्थिति मदना ललना ॥
माधवतनिया खेळति होरी ॥ १ ॥

भद्रा — मुलिनो चला आतां घरीं जाऊं उशीर झाला.

(सर्व जातात)

वसंतक— (वसंता जवळ जाऊन) मित्रा वसंता, काय सांगू ! ही संधी फार चांगली होती ! परंतु डाव साधला नाहीं. धीर सोडूनकोस. मी त्या भद्रां बाई-कडेस जाऊन तिचे मन वळवून तुझें काम खास करून देतो समजलास. (जातो)
वसंत—(वाईट वाटल्या सारखें करून)

साकी.

पुरा पाहिली शशि मुखि नयनी मनोरमा जी त्हदया ॥ त्रस्त मृगी परी चंचल नयना मन्मथ आली पुजाया ॥ मजशीं एकांतीं ॥ भेटल-का वासंती ॥ १ ॥ (जातो.)

(इतक्यांत काकेंदु व कर्कंधू येतात.)
काकेंदु-मित्रा कर्कंधू काय सांगू त्या वासंतीचें सुरूप.

पद (परज कालिंगडा त्रिवट.)

रोमांकित तिची शरीर यष्टि ॥ कुरंग नयना
नाचवि दृष्टि ॥ धृ० ॥ यौवन दशा ही नूतन
पावली ॥ आहे तशी जरि सदां राहिली ॥
तरीच मानस पावेल तुष्टि ॥ १ ॥

कर्कंधू–अहो महाराज! बसा आतां हाका मारीत! वसंतानें वसंतक भटजी कडून गुप्त प्रयत्न चालविला आहे आणि तीचा प्रीति विवाह वसंताशीं खास होणार! तुमची मसलत फसली! आतां तरी हा नाद सोडा! परवां सोंग ढोंग करून वासंतीला पहाण्याकरतां गेलांत आणि मार मात्र खाऊन परत आलांत!!

काकेंदु–तूं असें समजू नकोस कीं तुझ्या या अशा पोकळ उपदेशाने माझें धैर्य खचेल व तो नाद मी सोडीन! हा पठ्या मोठा मानी आहे! ह्मणेल तसें करील हें पक्कें समज!!

कर्कंधू–

पद (पूर्वी त्रिवट)

जिवलग माझा मित्र ह्मणोनीं ॥ करितों तुज
उपदेशा निशिदिनीं ॥ धृ० ॥ वितंड वादी कैसें रमलें मानस तुझें लंपट जहालें ॥ क्षीण बुद्धितें दे सोडोनी ॥ १ ॥

हें पहा, माझें कर्तव्य मी केलें, आतां पाहिजे तसें कर. (जातो.)

कार्केदु—काय चमत्कार! वासंती करतां वसंताचा प्रयत्न सुरू आहे! तो लबाड बकध्यानी वसंत अजून आ-शा धरून आहेच! लोध्राचार्यानें तर निश्चय केला आहे कीं बब्बुलाचार्यालाच वासंती द्यावयाची या सपाट्यांत माझी मसलत कशी तडीस जाणार! अ-सो, आतां तिच्या हाताला हात लाऊन तिचे पाणी ग्रहण केलें पाहिजे याला युक्ति काय बरें का-ढावी. (विचार करून)

पद (जिल्हा त्रिवट)

वेशधारी रोग हारी, होउनी पाहिन शशिमुखी सुंदरी ॥ धृ० ॥ धन्य मानिन जनी हस्तस्पर्शे पुनरपि पाहिन मदनमंजरी ॥ १ ॥

आतां नाका डोळ्याचा वैद्य होऊन वासंतीकडे जावें ह्मणजे आपले हेतु पूर्ण होतील (जातो)

(इतक्यांत भद्रा, वासंती माधविका वगैरे येऊन ब-सतात.)

भद्रा—कांग माधविके आज नाहीं का कांहीं गाणे ह्मण-त? हेंग काय असें!

माधविका—रोज उठून कसचें गाणे! मला बाई कंटा-ळा आला! आज वासंती एकटीच का ह्मणेना! ती काल आपल्या शेजारच्या रामभटजीची मुलगी चिं-गी तिचेजवळ नवीनच एक मुरली शिकली आहे.

वासंती—पण मला सगळीं कडवीं कुठे पाठ झालीं आहेत!

माधविका—अग चुकत माकत येईल तसेंच ह्मण.

वासंती–

मुरली (भूप–दीपचंदी)

मधुर मनोहर हरि तुझी मुरली ॥
ऐकोनी मानस वृत्ति चळली ॥ धृ० ॥
कीर पीक शिखी पहा नादावले ॥
अंबरि उडुपति तटस्थ झाले ॥
गृहधंदा जन विसरुनी गेले ॥
कुंजवनीं हरि चरण सरोजीं ॥
स्त्रीमनवृत्ति भ्रमरी जडली ॥ १ ॥

(इतक्यांत वसंतक भटजी येतात.)

वसंतक–(मनांत) जेवढा पहावा तेवढा चमत्कार? पहा हा लोभाचार्य आपली मुलगी त्या थेरड्या बब्बुलाचार्याला देण्याचा विचार करतो व त्या मुलीची भद्रा जरि सावत्र आई आहे तरी तीच्या मनाला तो थेरडा येत नाहीं तीला असे वाटते की वासंतीला चांगला कुलीन सुशिक्षीत स्वतः मिळविणारा असा नवरा पाहून तिचें लग्न करावें शिवाय काकेंदु तर तीच्या करतां नाहींनाहीं ते उपाय करतो आहेच. असे एका मुलीकरतां तीन नवरे जिभल्या चाटताहेत खरें परंतु माझ्या मनांतून त्या वसंला ती बायको मिळावी अशी इच्छा आहे तर या कामाकरतां त्या भद्रेजवळ लटपटपंची लढविली पाहिजे या कामाला मी तीकडे जातो (असे ह्मणून चालूं लागतो)

वसंतक—(आपणाशीं) ही लोभाचार्याची बायको भद्रा व ही तिची मुलगी वासंती बसली आहे. आतां मात्र माझ्या प्रिय मित्राचें काम फत्ते होण्याची संधी आली आहे खरी. (जवळ जाऊन) कसें काय वाहिनी? बरें आहेना? थोडे पाणी आणा पाहूं.

भद्रा–या भटजी बसा. अग मुली जा थोडे पाणी आण. भटजी आज आमत्रण कुठे होतें?

वसंतक– (पाणी पीत पीत) आज घरींच. आतांशा आमंत्रण नाहींना कांहीं नाहीं पण वहिनी वासंतीचें लग्न कधीं करणार? आतां ती मोठी झाली आतां अवधी राहिली नाहीं. तेव्हां यंदा वैशाख मासीं द्या बार उडवून ह्मणजे झालें.

भद्रा–जसें तिच्या नशिबीं असल तसें होईल खरेंच ह्मणाल तर माझ्या मनांत त्या बिजवराला कांहीं द्यायची नाहीं. तो श्रीमान असला ह्मणून काय झालें! पैसे घेऊन त्या थेरड्याला मी आपली मुलगी कांहीं देऊं देणारनाहीं.

वसंतक–कांहो वहिनी, आपले यजमान ह्मणतात कीं बब्रुलाचार्यालाच मी आपली मुलगी देणार असा त्यांचा आग्रह दिसतो! हे कसें काय?

भद्रा—त्यांचें काय! मी नाहीं बाई माझ्या मुलीला तेथें देणार! एकुलती एक मुलगी! चांगल्या तरूण सुरेख घरंदाजाच्या पदरीं पडली ह्मणजे जीव निष्काळजी झाला.

वसंतक–तुह्मी ह्मणतां तें सर्व खरें आहे, परंतु आचार्य-

तुमचें ऐकणार नाहींत. बाकी मी एक सावकाराचा मुलगा तरूण सुरेख साळसूद विद्वान असा पाहून ठेविला आहे. तुमची मर्जी असल्यास तें स्थळ मी खास जुळवून देतों मात्र आचार्य मध्यें विघ्न करतील या विषयीं आपण बंदोबस्त करा ह्मणजे झालें.

भद्रा—आपण कांहीं काळजी करूंनये. तें माझ्याकडे लागलें. वसंतक भटजी काय काय सांगूं रात्रंदिवस घरांत मुलीच्या लग्नाविषयींच भांडणे होत असतात. त्यांचें ह्मणणें कीं बब्रूलाचार्यालाच मुलगी द्यावयाची. कोण मेला हट्टी स्वभाव तरी! भटजी तुह्मी तरी सांगा यांत काय युक्ती करावी ती.

वसंतक—मी युक्ति सांगेन पण सर्व कामें त्या प्रमाणे झालीं पाहिजेत. त्यांत अंतर पडतां कामानये. नाहीं तर दोघांचीही फटफजीती होईल.

भद्रा—तुह्मी स्वस्थ असा सांगाल त्या प्रमाणे सर्व तजवीज ठेवितें मग तर झालें ना.

वसंतक—बरें तर आतां येतों एक दोन दिवसांनी भेटेन आणखी सुरेखशी युक्ती सांगेन (जातो.)

(इतक्यतांत काकेंदु नाका डोळ्याचा वैदु बनून येतो त्यास पाहून.)

वासंती—आई तो पहा नाका डोळ्याचा वैदु आला आहे. मी त्याला हाक मारतें! अरे ए वैदु इकडे ये.

भद्रा—चल ये हिकडे! चावट नाहीं तर! कशाचाग वैदु! मेले ते लबाड असतातहो! चल हो घरांत कशी.

वासंती—बाबा परवां ह्मणाले होते कीं वैदु आला तर

त्याच्यापाशीं शक्तीचें लोकस्याचें औषध घ्यावयाचें आहे ह्मणून मी हाक मारली. (इतक्यतांत लोभ्राचार्य येतो.)

लोभ्राचार्य–अग मुली, कोणग तो बाहेर आला आहे! नाका डोळ्याचा वैदु होय? बोलाव त्याला आंत. (वैदु घरांत येऊन लोभ्राचार्यांचे व वैदुचे बोलणें ऐकून भद्रेचें व लोभ्राचार्यांचें भांडण होते. वैदूला बाहेर घालवून देतात.)

वैदु–(आपणाशीं) कांहीं चिंता नाहीं. या बाईनें मला आपल्या नोकराकडून बाहेर घालविलें होय! आज ना उद्यां कधीं तरी त्या बाईची खोड मोडीन तरच नांवचा काकेंदु. (जातो.)

(इतक्यांत वसंत व त्याचा मित्र वसंतक येतात.)

वसंत–(आपणाशीं)

साकी.

सुखेच्छा तरि दुःख पुढति आपुलें पाउल टाकी ॥ प्रबल विधीची इच्छा तेथें कोण कुणातें हुडकी ॥ प्रतिकुल दैवाची ॥ गति घडली ही साची ॥ १ ॥

पद (कालिंगडा त्रिवट.)

मन्मथ शरिरीं करि दंगा ॥ धृ० ॥ मदनें केलें मन अविचारी ॥ स्वाभाविक मन चंचल भारी ॥ इच्छितसे वासंती संगा ॥ १ ॥

वसंतक–मित्रा, अरे काय हा ध्यास! तुला वासंती शिवाय दुसरें कांहींच दिसत नाहींना? तूं भीऊं नकोस. तुझें काम फत्ते होणार.

वसंत–शाबास! मी तुझे उपकार विसरणार नाहीं. बरें पण माझी व प्रियेची एकांतीं भेट होईल असें कर. ह्मणजे झालें.

वसंतक–अरे बाबा, उतावीळ होऊं नकोस. लोभाचार्य महा नष्ट आहे. संधी पाहून बेताबातानें काम केलें पाहिजे नाहीं तर मार मात्र पदरीं पडेल. तूं धीर सोडूं नकोस मी त्याच उद्योगाला जातों. (जातो)

वसंत–(आपणाशीं) माधवोद्यानांत अनंगाची पूजा करीत बसलेल्या वासंतीला पाहिल्यापासून माझ्या चित्तास यत्किंचितही समाधान नाहीं.

पद–(मुलतानी त्रिवट.)

पाहिन कधिं सखि वासंतीला ॥ संतत छंद तिचा मजला ॥ धृ० ॥ ध्यानीं मनीं आणि स्वप्नीं विलसे प्रिय सखीमय हें जगतचि भासे ॥
काय करूं या अधिर मनाला ॥ १ ॥

असो आतां माधवोद्यानांत जातों ह्मणजे थोडेसें तरी मनरंजन होईल (जातो)

(इतक्यांत काकेंदु व कर्कंधू येतात.)

काकेंदु—(आपणाशीं)

पद (कालिंगडा त्रिवट.)

पुनरपि पाहिन का वासंती ॥

बैसलि लेउनी वेश वसंती ॥ धृ० ॥
सरस अवयव गोंडस नेटकी ॥
उपभोगा या योग्य वसंतीं ॥ १ ॥

मित्रा कर्कंधू काय सांगूं सध्या ग्रह अनकूल नाहींत जेथें जावें तेथें फजिती होते काय करावें! कांहीं उपाय सुचत नाहीं. त्या लोभाचार्यांच्या बायकोनें मोठा घात केला!

कर्कंधू–मनांत वाईट इच्छा असली कीं त्याचा परिणाम कसा बरें चांगला होईल. वाईटाचा परिणाम वाईटच. स्वदेशीय पुराणीकानें वसंतोत्सव समयीं उपदेश केला तो ध्यानांत धर आणि तसा वागत जा. हा हूड पणा अगदीं सोडून दे असें कैकवेळां तुला सांगितलें पण तुला कथा, कीर्तन, पुराण; पाणिवठे इत्यादि ठिकाणी जाऊन परस्त्रियांकडे पाहून मनांत कुतर्क आणल्या शिवाय राहवतें कोठें! कारण तूं पडलास आंबट शौकी!!

काकेंदु–शेंकडा नव्याण्णव तरी माझ्यासारखे आंबटशौकी सांपडतील. तुमच्या सारखे जे क्षौरी असतात ते उघड कर्में करींत नाहींत चोरून करतात. हाच कायतो तुमच्या आमच्यांत भेद! रावसाहेब, बाबासाहेब यानी उघड कर्में केलीं तरी चालतात. आणि आमच्यासारख्यानी चोरून जरी कर्में केली तरी दोष! वाः! फार चांगली गोष्ट!!

कर्कंधू–तुझी असेच! आपण खाड्यांत पडून आपल्या-

बरोबर दुसऱ्यालाही ओढणारे असे आपण अगदीं पाजी मनुष्य अहां!! तुझी संगती नको (असे म्हणून जाऊं लागतो.)

काकेंदु—मित्रा असा रागावूं नको! तुला जर माझा त्रास आला असेल तर माझी संगती सोडून दे.

कर्कंधू—अरे राग नाहीं. आपल्याला ह्या जगांत राहाणे असेल तर असल्या गोष्टीचा नाद सोडून दिला पाहिजे. नीट रीतीनें वागलास तर तुला कोणीही दूषण देणार नाहीं. बरें चला भोजनाची वेळ झाली बराच उशीर झाला. (जातो.)

काकेंदु—

पद (मालकंस त्रिवट.)

जगच्चमत्कृति पाहुनि मन्मति ॥
गुंग जहाली नवल वानु किती ॥ धृ० ॥
प्रकृति तितुक्या विकृति असती ॥
आवडि नावडि निर्णय करिती ॥
आवडि गोड हेंची ठरविती ॥ १ ॥

पद (कालिंगडा त्रिवट)

सुख भोगाया योग्य वपु हे ॥
स्त्री विषयाविण कांहीं नोहे ॥ धृ० ॥
अलौकिक सुख विषयीं आहे ॥
सुंदर स्त्री जरि मिळे सदोदित ॥
स्वर्ग सुखातें कुणि नच पाहे ॥ १ ॥

दुसरा अंक समाप्त.

अंक २ रा.

(लोभाचार्य व भद्रा दोघे भांडत येतात.)

भद्रा–हा काय बाई तरी हट्ट! मी आपली मुलगी तशी च ठेवीन पण त्या थेरड्याला कधीं ही देणार नाहीं.

लोभाचार्य वाहवा! तूं मोठीच शहाणी आहेस ज्याला मी मुलगी देणार त्याचें कूलशील केवढें वीस्तीर्ण आहे! संपत्ती विपूल. म्हातारा आहे खरा पण चांगला भष्ट पुष्ट आहे. त्याच्या घरांत दुसरें कोणी ही नाहीं तेव्हां पुढें मागें त्याची सर्व जिनगी आपल्याच घरांत येणार.

भद्रा–अहाहा! जळली मेली ती इच्छा! घरांत का पैसे कमी आहेत! मुलीनें काल साफ सांगितलें कीं, "बाबानें त्या म्हाताऱ्याला मला देण्याचा निश्चय केला त्या पेक्षां जर माझा तुह्माला कंटाळा आला असेल तर मला विहिरींत का टकलून देत नाहीं." आतांच्या काळच्या मुली त्याना वाईट बरें सर्व समजतें. पैसे घेऊन म्हाताऱ्याला मुलगी देण्याचें वेड डोक्यांत कुठून शिरलें हें! मी सांगितल्या वरून वसंतक भटजींनी एक चांगला श्रीमंताचा मुलगा पाहून ठेविला आहे त्यालाच मी आपली मुलगी देणार. मग कांहीं होवो.

लोभाचार्य— तें कांहीं असो, तुझा व मुलीचा हट्ट मी कधीं ही चालूं देणार नाहीं समजलीस!

भद्रा—(रागानें) बरें पहातें तर तुमचा कसा काय हट्ट चालतो तो! हा काय तरी मेला जुलूम!!

लोभ्राचार्य—ह्या लोभ्राचार्याशीं गांठ आहे! बायकांचें शहाणपण काय तें चुलीपाशीं! उगाच व्यर्थ उठाठेवी पाहिजेत कशाला? माझ्या मनास वाटेल तसें मी करणार समजलीस. (जातो.)

(इतक्यांत वसंतक येतो.)

वसंतक—(आपणाशीं) माझ्या वसंताचें काम खास होणार असें मला वाटतें. हें नाजूक काम नाजूक हातानेंच झालें पाहिजे लोभ्राचार्यांची बायको भद्रा अनकूल असली ह्मणजे झालें. अरे ही भद्रा एकटीच बसली आहे (जवळ जाऊन) कसें काय बहिनी! काम धाम आटपलें वाटतें!

भद्रा—कशाचें काम आणि कशाचें धाम! नेहमीचें पाठीमागें लागलेंच आहे.

वसंतक—लोभ्राचार्य काय ह्मणतात? मुलीच्या लग्नाचा बेत कसा काय चालला आहे? आमचें काम फत्ते होणार कीं नाहीं?

भद्रा—भटजी, कांहीं काळजी करूं नका. तुमच्या इच्छेप्रमाणेंच सर्व गोष्टी होतील. आमच्या घरचा स्वभाव हट्टी आहे पण मुलगी कुठे आहे कबूल! तिला जो आवडेल त्याच्याशींच मी लग्न लावून देणार. उगाच हजार पंच्रा उठाठेवी कशाला पाहिजेत. अहो दोघांच्या जन्माच्या गांठी पडणार त्यांत आई बापानीं नर जपूंनये तर कुणी जपावें?

वसंतक–तुह्मी ह्मणतां तें अगदीं यथायोग्य आहे. हें पहा मी असें ह्मणतों कीं मुलीची व मुलाची एकवेळ एकांतीं गांठ पडावी ह्मणजे बरें. कारण दोघांचें मन एक झालें कीं तो शास्त्राधारानें प्रीति विवाह होतो मग आचार्यांनीं किती जरी हट्ट धरला तरी त्यांचें कांहीं चालणार नाहीं.

भद्रा–तुह्मी तोड काढली ही ठीक आहे. एक दोन दिवसांनीं फेरी करा ह्मणजे काय तें कळवीन.

वसंतक–ठीक आहे एक दोन दिवसांनीं भेटेन. (जातात) (इतक्यांत काकेंदु येतो.)

काकेंदु–(आपणाशीं)

पद (पूर्वी त्रिवट.)

चपलाक्षीया चपल मनाच्या ॥ हरिती स्वांता
सकल जनांच्या ॥ धृ० ॥ पीवर तुगस्तनभर--
वेशें, मंजु घोषें बहु संतोषें, दाविती झोंका
श्रृंगाराच्या ॥ १ ॥

पद (लावणी.)

स्त्री जाती ही मोहक वस्तु अलौकिकहो त्रिभु-
वनीं, केवळ विषय सुखाची खाणी ॥ मोहिती
जनमन मंजु भाषणीं ॥ संतोष वृत्ति दावुनी ॥
असा कोणी न पाहिला जनी जो न भुले स्त्री
स्तनावरण कटाक्ष क्षेपणीं ॥ १ ॥

लोभ्राचार्यांनीं मी लहान असतां माझ्या बापापाशीं बोलून ठेविलें होतें. कीं "मला मुलगी झाली तर तुमच्या मुलाला देऊं." तें बोलणें ह्यातारा विसरला होय? आणि त्या ह्यातार्‍या थेरड्या बब्रुलाचार्यांच्या संपत्तीला पाहून मोह पावला काय? असो कांहीं चिंता नाहीं! वासंतीची व माझी भेट होण्याची आशा तर खुंटलीच. आतां धाडस केल्या शिवाय प्रतीज्ञा शेवटास जाणे कठीण आहे. माझ्या मित्राला ही थोडासा चमत्कार दाखविला पाहिजे. लोभ्राचार्यांच्या बायकोनें माझी मान हानी केली तेव्हां तिची तर हा पठ्या खोड मोडणार उदयीक नदीवर बायका स्नाना करतां येतील त्या वेळेस वेड्याचे सोंग घेऊन थट्टा मस्करी करीत कांहीं अपूर्व रीतीनें सूड उगविला पाहिजे. असें केल्यानें त्या भद्रेचा तोरा नाहींसा होईल. आतां हें वाईट कर्म केल्यावर प्रसंग आल्यास फार जपावें लागेल. कांहीं हरकत नाहीं आपल्या शहरचे अधिकारी मालचाटे व पेंडेचे तट्टु आहेत, अक्कलसें जुक्तीनें चलना!! मित्र कर्कंदु याला बरोबर घेऊन तिकडेस जावें. (जातो.)

(वासंती, भद्रा, माधविका वगैरे स्त्रिया नदीवर स्नाना करतां येतात.)

वासंती—अग ए माधविके. पुढें जाऊं नकोस. या समोरच्या दगडावरच लुगडीं धू बरें का! पाणी फार खोल आहे.

माधविका— मला माहित आहे परवां माझ्या देखतच ती रामभटजीची मथी बुडत होती.

वासंती—माधविके, चला ते गडवे बिडवे घांसूं. हेंग काय! अजून लुगडीं धुवायचींच आहेत वाटतें! आ- ई आंग धुतली. चला चला लवकर. (लुगडीं धुवूं लागतात.)

(इतक्यांत काकेंदु व ककंधू नदीवर येतात.)

काकेंदु—

पद (कानडा त्रिवट.)

नदी जल खळखळ वाहे झुळझुळ ॥
मधुर असे हे उदकही निर्मळ ॥ धृ ॥
वस्त्र धूती स्नाने करिती ॥
कुच सम कुंभा उदकें भरिती ॥
एकमेकी प्रति हितगुज सांगती ॥
त्या योगें ही झाली कलकल ॥ १ ॥

पद (धुमाळी.)

ही एक श्यामवर्ण पुतळी जणु रंभा भूतळावरी आली ॥ चाले ठुमकत, मुरका मारित, पदरा सावरित स्नान करूं पातली ॥ तरुणपणाचा बहार अंगी पाहुनी मन्मती घाली ॥ १ ॥

ककंधू—वाहावा! मित्रा काकेंदु मला असें वाटतें कीं रात्रं दिवस या नदीवरच बसून रहावें.

पद (बहार त्रिवट.)

सघनघनतरु छाया नटली ॥ उदकीं प्रतिबिं बें वठलीं ॥ धृ० ॥ मदन सखा ऋतु वसंत

आला, तरुवल्लीगण प्रफुल्ल झाला, वसंतोत्सव सीमा झाली ॥ १ ॥

कार्केदु–(आपणाशीं) ह्याच बाईनें माझी निर्भत्सना केली. तिचा सूड उगविण्याची जी मी प्रतिज्ञा केली होती ती पूर्ण होण्याची ही वेळ फार चांगली आहे. आतां मी आपल्या मित्रास या झाडाखालीं बसवून आपला कार्यभाग साधून घेतों (उघड) मित्रा तूं जरा इथें उभारहा मी हातपाय धुवून येतों. (स्त्रियां जवळ जातो व कांहीं वेड्या सारखें बडबडूं लागतो.)

पद (कालिंगडा त्रिवट.)

दे दे सुंदरी मुख चुंबन दे ॥ धृ० ॥ तृषित मना अधरामृत पाना लवकरी करूं दे ॥ मधुरस म मधु हें मज पीऊंदे ॥ पीन पयोधर कंचुकी तटतटी ॥ लाजूनको दे आलिंगन दे ॥ १ ॥

(असें ह्मणून भद्रेचा मुका घेतो व सर्व स्त्रियांचे अंगावर धावून जातो. गडबड होते सर्व शिवीगाळ करतात.)

भद्रा—(रागानें) अरे मेल्या तुझें निसंतान होवो! तुझ्या तोंडाला किडे कां पडले नाहींत! अगबाई! हा काय जुलूम तरी! अग ए माधविके जा ना घरीं जा आणि त्यांना बलावून आण. या मेल्याची खोड मोडली पाहिजे. बाई! बाई! हेंग काय चिन्हतरी! मेल्या तुला आई बहिणी आहेत कीं नाहींत?

कर्कंधू—(भीऊन कापू लागतो) आतां मात्र अवस्था कठीण आहे. या मूर्ख शिरोमणी काकेंदूच्या नादीं लागून येथें आलों हीच अगोदर चूक झाली. आतां राजदंड होणार कीं नुसत्याच शिव्या खाऊन आमची सुटका होणार हें कोण जाणे! महाराज हें फार चांगलें केलेंत या करतांच मला येथें येण्याचा आग्रह केलात वाटतें! वाहवा! परमेश्वरानें मूर्तिपण खूप बत्तीस लक्षणी घडविली आहे!!

काकेंदु-(हंसून) "लोकां सांगे ब्रह्मज्ञान आणि आपण कोरडे पाषाण" सर्व जग असेंच आहे. ज्या गोष्टी लोक एकांत अंधारांत करतात त्याच आह्मी दिवे लावून लोकां देखत करून दाखवितों! तुमच्या सारखा मी क्षौरी नाहीं. अरे जा मला कोणाचीच पर्वा नाहीं! कां माझ्याशीं आपण तोऱ्यानें वागत होतांना? आतां कशी फेंफें झाली!!

कर्कंधू-बाबा क्षमा कर! चुकलों! पदर पसरतों! तुझ्या बरोबर आलो हीच माझ्या हातून अगोदर चूक झाली. आतां या पुढें आपली संगती पुरे! यांतून एकदां सुटका झाली कीं मिळविली!!

काकेंदु—मित्रा भिऊंनकोस! या गोष्टीच्या परिणामाकडे दृष्टी दिल्या शिवाय तुला वाटतें हें मी कृत्य केलें? पहा आतां कशी गम्मत करतों! एवढें मात्र वारंवार तूं ह्मण कीं हा वेडा आहे. उगाच याच्या नादीं कां लागतां?

[इतक्यांत लोभाचार्य येतो.]

लोध्राचार्य–काय झालें? काय? गडबड कशाची?

भद्रा–ते पाहिलेत का दोघे सोटेश्वर नारायण कसे उभे आहेत ते! तो बोकडा सारखा दिसतो आहे तो त्या णे या पोरीची थट्टा केली आणि माझा ** घेतला!!

लोध्राचार्य–काय ह्मणतेस काय? थट्टा केली आणि ** घेतला! तरी मी नेहेमी सांगत असतों कीं नदी वर तरण्याताठ्या मुलींना घेऊन जाऊंनको ह्मणून! पण माझें ऐकतो कोण! [जवळ जाऊन] बरें पण तो जातीचा कोण होता? आपल्याच पैकीं असला तर मोठेसें नाहीं! पण त्याला सोडतां कामानये त्याची खोड मोडली पाहिजे. चल मला दाखीव, तो लुच्या कुठे आहे तो पाहूंदे!

भद्रा–तो पहा लठ्ठा मेला तेथें उभा आहे.

लोध्राचार्य–अरे लुच्या! अरे लबाडा! [शिव्यागाळी करून त्याला मारावयास जातो. बोलाचाली होते का केंदु वेड्याचें सोंग घेऊन लोध्राचार्याचा मुका घेतो.]

कर्कंधू–अहो उगाच कां त्या वेड्याच्या नादीं लागतां? क्षमा करा, झालेली गोष्ट कांहीं परत येत नाहीं. बोलून चालून तो वेडा!!

भद्रा–[लोध्राचार्यास] चला त्यांच्या नादीं उगाच कां लागतां. रस्त्यांत फजीती नको. चलाग मुलींनो पुनः स्नान करून घरीं जाऊं [लोध्राचार्यांची व काकेंदुची पुनः झटापट उडते तो पुनः सर्वांचे मुके घेण्याकरतां धाऊन जातो इतक्यांत नगर रक्षक येतो.]

रक्षक–कोण आहे रे? रस्त्यांत कशाची गडबड?

लोध्राचार्य–कांहीं नाहीं आमच्या घरचीं मनुष्यें मुली बाळी नदीवर गेल्या होत्या. तेथें या मनुष्यानें त्यांची थट्टा केली.

अधिकारी–कोण आहे रे तो लबाड? कुठे आहे तो पा हूंदे! [अधिकारी त्याचेजवळ जातो काकेंदु अधिका ऱ्याशीं कान गोष्टी करून लांच देतो. व पुनः वेड्या चे ढोंग करून अधिकाऱ्यांसुद्धां सर्वांचे मुके घेतो. सर्वांची गडबड उडते.]

अधिकारी–अहो ह्यातारेबुवा जा घरीं जा या वेड्याच्या नादीं कशाला लागतां (सर्व जातात.)

काकेंदु—कां मित्रा कशी गम्मत झाली? बाबा सबकु- च अक्कलसें पैदा होता है! गाफी लोंका माल अक्कल वानोका खुराक है!!

कर्कंधू–बाबा पुरे कर तुझी संगती!!

काकेंदु–माझ्या वाईट वर्तनानें तुला त्रास झाला हें मी जाणतों! आजपासून मी हे सर्व चाळे सोडून दिले व तूं सांगशिल त्याप्रमाणे वागेन. (दोघे जातात)

वसंत—(आपणाशीं)

पद (त्रिवट.)

ओढाळचि मन पुढती धावें ॥
सुंदरीचें मुख वाटे पहावें ॥ धृ० ॥
साध्य नसे ती सुदति तरि करि ॥
यत्न वृथा धरि आशा अंतरी ॥
मूढमती या काय ह्मणावें ॥ १ ॥


वसंतक—मित्रा तुझें काम फत्ते झालें उदयीक वासंतीची व तुझी एकांत गांठ पडेल. जा आपला कार्यभाग साधून घे. काळजी करूं नकोस. मला आतां काम आहे मी जातों. (जातो)

वसंत—वाहावा! फार चांगली गोष्ट झाली.

पद (पूर्वी त्रिवट.)

मित्र वसंतक माझा जिवलग ॥
त्द्दयिं उगाही चिंता तगमग ॥ धृ० ॥
इच्छित कार्या विघ्न न होवो ॥
सखि वासंती अंकागत हो ॥
मज संसारीं काय उणे मग ॥ १ ॥ (जातो)

अंक तिसरा समाप्त.



अंक ४ था.

(वासंती व माधविका येते.)

वासंती—(आपणाशीं.)

पद (जिल्हा त्रिवट.)

वृद्ध वरातें मज देऊनियां ॥
व्यर्थ घालवी माझी काया ॥ धृ० ॥
दुःख सागरीं मजला लोटिती ॥
तात हटेली त्यांसि न माया ॥ १ ॥

माधविका—अग तूं भीऊ नकोसहो! तुझ्या बाबाच्या मनांत त्या थेरड्याला द्यायची असें जरी आहे तरी तुझ्या आईला हें कसें बरें आवडेल? वसंतक भटजीनीं चांगला नवरा पाहून ठेवला आहे. काल तुझ्या देखतच ह्या गोष्टी चालल्या होत्या. तुझी त्याची आजच एकांत गांठ घालून देतों असें भटजीनीं कबूल केलें आहे. सर्व माहित असून वेड्या सारखी रडतेस कां? तुझ्याच मना प्रमाणें सर्व गोष्टी होतील. कांहीं काळजी करूं नकोस.

वासंती—होय, तें सर्व खरें पण बाबांचा स्वभाव फारच चमत्कारीक आहे. त्यांचे पुढें कोणाचें काय चालणार?

माधविका—तुझ्या आईनें बाबाना परवां साफ सांगीतलें कीं माझी पोर कांहीं म्हाताऱ्याला द्यायची नाहीं. दोघां-

चें भांडण होत होतें. यांत तुझाच फायदा आहे. तूं स्व-स्थ ऐस. मी जातें आतां, आईनें मला घरीं लौकर ब-लाविलें आहे. (जातें)

(इतक्यांत वसंत येतो)

वसंत–(आपणाशीं)

पद (दादरा)

सव्य नेत्र सव्यबाहु स्फुरण पावतो हे ॥
सखि वासंती भेटेल हा शकुन बोलतो हे ॥ १ ॥

(पुढें पाहून) अरे ! वसंतकानें सांगितल्या प्रमाणें ही माझी प्रिया इथें एकटीच बसली आहे. वाहावा ! फार चांगली गोष्ट झाली. (जवळ जातो वासंती घाबऱ्या घाबऱ्या उभी रहाते]

वसंत—भिण्याचें कांहीं कारण नाहीं.

वासंती–काय माझ्या सोबतीणी मला येथें एकटीला टाकून गेल्या !

वसंत–

पद [झंपा.]

प्रिये सांग आतां काय सेवा करूं ॥
पाय तुझे चुरूं हस्त कमलें ॥ धृ० ॥
सोड भीती सखे एकटी तूं कशी ॥
दक्ष संरक्षणी पक्ष तुझा मनी ॥
हस्तपाशें झणी रक्षितोंगें ॥ १ ॥

वासंती—

पद [त्रिवट कालिंगडा.]

कोण कुटिल तुह्मी ये स्थलिं आलां ॥ धु० ॥
कथन करा मनी हेतु धरीला ॥
विनवितसे ही विनयें अबला ॥ १ ॥

वसंत—

पद [भैरवी त्रिवट.]

वसंत मी सखे वसंतकाचा ॥
मित्र असेंगे जिवलगसाचा ॥ धृ० ॥
तव जननीनें वसंतकातें ॥
सहाय घेऊनी सुभग वरातें ॥
योजियलें तो हा तुज, मातें ॥
प्रेमभरानें पहा दीनातें ॥ १ ॥

वासंती—आतां मात्र मी जन्मभर सुखी झालें [दोघें आलिंगन देतात.]

वसंत—

पद (लावणी.)

माधव वनीं तुज प्रथम वसंतीं वसंतोत्सवीं पाहिलें ॥
तैं पासुनीं मदनाग्नीनें शरीर कृश कीं झालें ॥
तव तनुस्पर्शें अतां दुःख सर्व ही विलया गेलें ॥ १ ॥

वासंती—प्रिया माझी अवस्था काय सांगू! आपल्या विषयीं आईच्या तोंडानें ऐकल्या पासून—

पद (कालिंगडा त्रिवट.)

रात्रंदिन मज चैन पडेना ॥ धृ० ॥
काय करूं तात हटेली ॥
तुजशीं विवाह करूं देईना ॥ १ ॥
काळजीनें या झुरुनी गेले ॥
विधीतें माझी आली करुणा ॥ २ ॥

वसंत—ईश्वरी नियमानेंच आपल्या आज गांठी पडल्या तर मग हाच आपला प्रीति विवाह झाला.

वासंती—प्रिया असें जरी झालें तरी मला भीति वाटते कीं तुझाला कोणी पाहील तर आतां लवकर येथून जा.

वसंत—

पद (कालिंगडा त्रिवट.)

मुख चुंबन दे मजला सुंदरी ॥ धृ० ॥
परस्परीं जरी दृढ प्रेम तरि ॥
भिववशी कां मज या ग मंदिरी ॥ १ ॥

(इतक्यांत लोभाचार्य येतो.)

लोभाचार्य— अग ए मुली, दार उघड.

वासंती—तो पहा माझा बाप हाका मारतो आतां काय करूं! अग बाई आतां काय होईल कोण जाणे! देवा! देवा!! काय संकट हें!!

वसंत—(भीऊन कापूं लागतो) प्रिये कसें तरी करून

माझी येथून सुटका कर म्हणजे झालें! मी तुझ्या पायां पडतों! (असें ह्मणून पायां पडूं लागतो.)

वासंती–हें काय भलतेंच! भीऊ नका! मला एक उपाय सुचला आहे. तो मी सांगतें. ही माझी इथें काळी चंद्रकळा आहे ही अंगावर घेऊन खोलीच्या कोपऱ्यांत उभे रहा. माझा बाप भित्रा असून त्याला कमी दिसतें. ह्मणून भुता सारखें ओरडून त्याला भीति उत्पन्न होईल असें करा. कदाचित तितक्या वेळांत बाहेर जाण्याची संधी सांपडल्यास तसेंच निघून जा. (वसंत अंगावर काळी चंद्रकळा घेऊन दरवाजाच्या कोपऱ्यांत उभा रहातो. वासंती दरवाजा उघडते.)

लोध्राचार्य–(वासंती जवळ जाऊन). मुली तूं आतां मोठी झालीस! तुला सर्व समजूं लागलें! पहा त्या बब्बुलाचार्याला माळ घातल्या शिवाय दुसरा परिणाम नाहीं! मी तुझा हट्ट कधींही चालूं देणार नाहीं.

वासंती – बाबा तुमच्या मनांत जर माझे असें करायचें आहे तर मला इतकी मोठी तरी कशाला केलीत? माझे असे हाल करण्या पेक्षां मला विहिरींत कां ढकलून देत नाहीं? (इतक्यांत वसंत भुता सारखें ओरडतो) बाबा! बाबा! हें पहा भूत घरांत ओरडते!!

लोध्राचार्य–कोण? कुठे आहे?

वासंती–तें पहा काळें काळें कोपऱ्यांत दिसतें आहे.

[वसंत पुनः ओरडतो]

लोधाचार्य–काय माझ्या घरांत भूत आलें? अरे रांडले का भूता! ये ये पाहूं पुढें. या सोट्यानें तुला ठार करतों [पुनः वसंत ओरडतो सर्व भीतात. इतक्यांत वासंतीची चुलती येते तिच्या समक्ष वसंत अंगावरील काळें वस्त्र टाकून तेथून पळून जातो. वासंती घरांत जाते.]

चमालताई–कां भावजी ओरडलेत कां? भीती कसली वाटली?

लोधाचार्य–आमच्या घरांत भूत आलें होतें! तें आतांच नाहींसें झालें!

चमालताई–अहाहा! कशाचें भूतनाबीत! तुमचा जामात आला होता! तुमच्या बायकोनें आपल्या मुलीकरतां पाहून ठेवलेला नवरा वसंत तोच तो. माझ्या डोळ्या देखत पळून गेला!

लोधाचार्य–काय ह्मणतेस, तो वसंत होता! भूत नव्हे? [इतक्यांत वसंतक येतो] या भटजी वेळेवर आलेत. जा लौकर आणि त्या बब्बुलाचार्याला सांगा कीं येत्या वैशाख वद्य दशमीचा मुहूर्त चांगला आहे. लग्नाची तयारी करा असें जाऊन सांगा. [सर्व जातात.]

वसंतक–[आपणाशीं] ठीक आहे येथेपर्यंत माझी मसलत चांगली साध्य झाल्या सारखीच आहे. पहावें पुढें काय होतें.

चमालताई–हा लबाड भट त्या वसंताशीं मिलाफी आहे काय? कांहीं चिंता नाहीं याची मसलत फुकट जाईल अशी तजवीज केली पाहिजे. असो तो वसंतक

भट जाण्याचे पूर्वीच मी बब्बुलाचार्याला जाऊन भेटतें [जाते.]

[इतक्यांत वसंत येतो.]

वसंत—[आपणाशीं]

पद [कालिंगडा दादरा.]

वासंती वासंती सखि! गेली कुणीकडे प्रीति दाउनी याहो वसंती ॥ धृ० ॥ क्षणिक दर्शन क्षणिक सुखातें त्हृदयि उपजवी कामविकारा अशिवा भ्रांति ॥ १ ॥

वसंतक—अहो महाराज आतां सावध असा. वासंतीच्या बापानें लग्नाची तयारी केल्यासारखी आहे. वैशाख वद्य दशमीचें लग्न आहे तुझें काम साधेल अशी खटपट करतों तूं कांहीं काळजी करूं नकोस मात्र माझेवर दया असावी.

वसंत—

पद [धुमाळी.]

मित्रा तूं प्रीति रसायन मन्नयनासी त्हृदया तोषविशी ॥ दुःख सागरीं संसारीं या मित्र नाव ही खाशी ॥ किती वानु मी थोरी इची सकल व्यथा नाशी ॥ निष्काळजी मी आमरणांतीं मजला तूं न विसरशी ॥ १ ॥ [जातात.]

बब्बुलाचार्य–

पद [साकी.]

जगत्रयीं या वासंतीविण कांहीं दिसेना मज-
ला ॥ आम्रतरु मी मल्लीलता तूं दे आलिंगन
याला ॥ सुंदरी वासंती. गेली कुणिकडे तीं
सुदती ॥ १ ॥

चमालनाई–कां आचार्य? आपण दिलगीर कां? तुह्मी आमचे जांवई होणार. वैशाख वद्य दशमीचा मुहूर्त धरला आहे व लोभ्राचार्यांनीं लग्नाची तयारी करण्याविषयीं कळविलें आहे.

[वसंतक येतो, बब्बुलाचार्याला लग्ना विषयीं निरोप कळवितो. तो गेल्यावर] अहो तो भटजी लबाड आहे त्याणे लग्न तिथी भलतीच सांगितली.

बब्बुलाचार्य–कांहीं चिंता नाहीं तो कदाचित बोलतांना चुकला असेल. तुह्मी जा मीही आतां आपल्या कामाला लागतो. [जातात.]

[लोभ्राचार्य व बब्बुलाचार्य बोलत येतात व वसंतक चोरून ऐकतो.]

लोभ्राचार्य–काय करूं सर्व तयारी झाली परंतु आमची बायको ही गोष्ट कबूल करीत नाहीं. यामुळें घरांत नेहेमी तंटे सुरू आहेत. आज तर ती रागावून कुठे गेली कोण जाणे! बरें इकडे मुलगी तरी माझें कुठे ऐकते ती सुद्धां जीव द्यायला तयार! आतां इथें काय उपाय करावा!

वसंतक–पांचजन्य करावा! अथवा जीव द्यावा! थेरड्या, त्या सार्वजनिक पुराणिकानें उपदेश केला तो सर्व व्यर्थ झाला ना!!

वब्बुलाचार्य–ह्मणजे याचा अर्थ काय! लग्नाची तयारी केलेली फुकट जाणार होय? याचा विचार पूर्वींच करायचा होता! आतां या फजीतीला पारावार नाहीं. बरें आतां याला तोड काय?

वसंतक – मी तोड काढली आहे थेरड्या भीऊं नकोस तुझी मी खोड मोडतो.

लोध्राचार्य–याला तोड इतकीच मी आतां कामाकरतां बाहेरगावीं निघून जातों व मी येईतोंपर्यंत माझ्याच घरीं जाऊन रहा मुलीला दागीन्याचा लोभ दाखवून कांहीं वळेल तर पहा.

वब्बुलाचार्य-ठीक आहे. आपण सांगीतल्याप्रमाणें व्यवस्था करतों. आपण लवकर परत या. (दोघे जातात)

वसंतक–हे दोघे पुढें काय करणार हें मला समजलें. आतां आपला मतलब साधण्याकरतां गुप्त रीतीने तजवीज करावी व दोघांची मसलत फोडून खोड मोडावी. आतां वासंतीला पहिल्यानें भेटावें (जातो.)

वब्बुलाचार्य–(आपल्या नोकरास) ए फांफाजी, ए चांपाजी, माझ्या हुकूमाशिवाय कोणालाही आंत येऊं देऊं नका. (आपणाशीं) ही पोर माझ्याशीं लग्न करीत नाहीं काय! बरी एकटी सांपडली आहे. अशीच एकदोन दिवस कोंडून ठेविली ह्मणजे सहज

कबूल होईल- चवदाव्या रत्नाला कोण वश होत नाहीं! (जातो (

वसंतक–(आपणाशीं) काय वासंतीला बब्बुलाचार्यांनीं कोंडून ठेविलें आहे! कांहीं चिंता नाहीं. या दोघां शिपायांस अमली पदार्थ खावयास देऊन आपला कार्यभाग साधावा. (त्या दोघांपाशीं जाऊन तंबाकु खात बसतो. त्या दोघां नोकरास तंबाकुच्या गोळ्या देतो. ते दोघे त्या गोळ्या खाऊन बोलत बोलत प्रेतासारखे बेशुद्ध पडतात.) आतां हीं दोन्ही प्रेतें इथें ठेऊन उपयोगी नाहीं. मोलकरी बलावून त्यांच्याकडून रातोरात हीं प्रेतें नदीवर नेऊन पुरून टाकावीं म्हणजे केलेलें कर्म गुप्त राहील. (जाऊन दोघे मोलकरी घेऊन येतो.) हे कोणी वाटसरू इथें मरण पावले आहेत. हीं प्रेतें मुकाट्यानें नदीवर नेऊन पुरून टाका. याबद्दल पंचवीस पंचवीस मोहोरा बक्षीस मीळतील. जा लौकर कामगीरी बजाऊन परत या मी इथेंच आहे (मोलकरी प्रेतें घेऊन जातात) (वसंतक घरांत वासंतीकडेस जाऊन तिच्या कानाशीं लागतो. तिला दुसऱ्या खोलींत जाण्याला सांगून तिच्या बिछान्यावर शाल घेऊन निजतो. इतक्यांत बब्बुलाचार्य येतो.)

बब्बुलाचार्य–अरे फांकाजी चाफाजी गेले कुठे? लबाड! हरामखोर!! (पुढें जाऊन) अरे ही वासंती इथेंच निजली आहे (जवळ जाऊन) प्रिये! पहा मला तूं वश हो! माझें ऐश्वर्य केवढें! माझा पराक्रम का-

य! इकडे लक्ष दे. मी तुझे हेतु पूर्ण करीन! काय बरें असें! एक शब्द तरी बोल.—

पद (धुमाळी.)

तूं सुभग देखणी मीग सुंदर देखणा,
दे दे आलिंगन मुख चुंबना ॥
करुंदे तृषित मना या अधरामृत पाना ॥
उपवनीं जाऊं रतिसुख अनुभऊं,
जे स्थळीं कोकिल करिती मंजुल गाना ॥ १ ॥

(वसंतक आंगावरची शाल काढून उठून उभा रहा तो त्याला पाहून बब्बुलाचार्य भितो.)

वसंतक—अरे मुर्खा ही वासंती नव्हे! हा वासंता आहे समजलास! अरे थेरड्या तुला वासंती दाखवितों थांब· (त्याला मारून बाहेर घालवितो) अग मुलीं वासंती इकडे ये. (वासंती येते) आतां तूं स्वस्थ बैस. तुझे सर्व हेतु पूर्ण होतील. आतां मी घरीं जाऊन वसंताला पाठवून देतो. (जातो)

बब्बुलाचार्य—(रडत कण्हत आपणाशीं.)

पद (दादरा–पिलु.)

ओसिंत कीं! स्वर्मी असें! नवल वर्तलें ॥
दैवचि हें मजवरती आजि कोपलें ॥
वासंती सुख निधान नाहीं लाधलें ॥
काय करूं जाऊं कुठें स्थल न उरलें ॥ १ ॥

(रडत रडत स्मशानाकडेस जातो)

मोलकरी—(बब्बुलाचार्याला पाहून) अरे हें पहा भूत आलें!

दुसरा मोलकरी—अरे पुढ जाऊं नकोस, खैस, गीरा, किंवा ब्रह्मराक्षस असेल! मानेवर बसेल!

बब्बुलाचार्य—अरे! मी त्या वासंतीच्या नादांत इकडे स्मशानांत कुठे आलों! अरे हीं भूते उठली कीं काय! (दोघां मोलकऱ्यांस भूतें समजून मारावयास जातो ते याला भूत समजून त्याच्या उरावर बसून त्याला मारून स्मशानात पुरून घरीं निघून जातात.)

बसंतक—(आपणाशीं) ते दोघे मोलकरी कां बरें आले नाहींत. (मोलकरी येतात) कारे इतका वेळ कां बरें लागला?

मोलकरी—नाहीं महाराज, स्मशानांत एक भूत येऊन त्याणे फार त्रास दिला आह्मी दोघांनीं त्याला बांधून पुरून टाकलें. तें भूत आमच्या हाता पाया पडूं लागलें आणि ह्मणूं लागलें "कीं भूत नव्हे मी बब्बुलाचार्य आहे मला पुरू नका" त्याला पुरून टाकला आणि इकडे निघून आलों ह्मणून उशीर लागला.

बसंतक—[आपणाशीं] फार चांगली गोष्ट झाली सुंठीशिवाय खोकला गेला, [मोलकऱ्यांस पैसे देऊन रवाना करतो.] आतां वासंतीची व बसंताची भेट करून देतों [जातो].

वासंती—(आपणाशीं)

पद (त्रिवट कालिंगडा.)

तात तामसी मज कारागृहीं ॥
ठेवियलें पहा कोणि न पाही ॥ धृ० ॥
गेली कुणिकडे माझी जननी ॥
एकटीला हो येथ टाकुनी ॥
अनाथला यांतुनि त्राही ॥ १ ॥

वसंत— जिवलग सुंदरि भीऊं नकोगे ॥
दास तुझा हा जवळीं असेगे ॥ १ ॥

वासंती— धन्य असें मी जगत्रयीं या ॥
दीनावरि ही केली माया ॥ २ ॥

वसंत— भीऊं नकोगे जिवलग सुंदरी ॥
जरि पडलिसया दुःख सागरीं ॥ धृ० ॥
व्यसनातुनिया सोडवितोंगे ॥
दे आलिंगन मुख चुंबन दे,
रति सुख विलास उपभोगूं दे ॥
मदन मी तूं मदनमंजीरी ॥ १ ॥

(इतक्यांत पर्जन्यानें भिजलेला व थंडीनें कुड कुड-लेला असा लोभाचार्य येऊन आपले बायकोस हाक मारतो.)

लोभाचार्य—अग ए दरवाजा उघड लवकर. (लोभाचार्य आला असे पाहून घाबरतात. वसंत नीट विचार करून भद्रे सारखें हुबेहुब बोलतो)

वसंत—मी कांहीं घराचें दार उघडणार नाहीं. जा कसे येथून निघून! पीडा आली पुनः घरांत.

लोध्राचार्य–अग मी तुझ्या पायां पडतों! वाटेंत येतांना पाऊस पडला! आंग भिजून थंडीनें अगदीं काकडून गेलों आहें. या वेळेस अंत पाहूं नकोस.

वसंत–(आतां आपला मतलब साधून घेण्याची ही संधीं बरी आहे.) वासंती वसंताला देण्याचें कबूल कराल तर दरवाजा उघडतें.

लोध्राचार्य—ती गोष्ट आतां कशी घडून येईल?

वसंत—तर मग दरवाजा तरी कसा उघडेल?

लोध्राचार्य—(आपणाशीं) आतां काय करावें! मी तर अगदीं थकून भागून आलों आहें. या वेळीं बायकोनें मला पेंचांत धरलें खरें. असो इच्या मनाप्रमाणें तोंडा पुरतें हो ह्मणून ह्मणावें (उघड) कांहीं चिंता नाहीं तूं ह्मणतेस त्या प्रमाणें सर्व व्यवस्था होईल. पहिल्यानें दरवाजा तर उघड.

वसंत—(हा लबाड आहे कदाचित कपट करील याच्या हातचें लिहून घ्यावें हें ठीक.) तें कांहीं नाहीं गांवांत कुठे तरी जा. "वासंतीचें वसंता बरोबर लग्न करून देण्याला कबूल आहें तसें न झाल्यास मी घर दार सोडून सन्यास घेईन अशीं अक्षरें लिहून आपली सही करा व तो कागद दाराच्या फटीतून आंत टाका. तो वाचून पाहीन आणि दार उघडीन. हें कबूल नसेल तर घरा दाराची आशा सोडा.

लोध्राचार्य–आतां काय करावें हें मोठेंच संकट! नशीब माझें! (जातो व कागद लिहून आणतो.) अग

हा घे कागद तूं सांगितलास तसा लिहून आणला. आतां तरी मला दार उघड.

वसंत—(कागद वाचून पाहिल्यावर दार उघडतो) बाबा नमस्कार! ह्यातारपणीं पैशाच्या आशेनें आपल्या मुलीचा छल केला हें चांगलें नाहीं! (वसंत आहे असें पाहून लोभाचार्य लाजून खालीं मान घालून उभा रहातो इतक्यांत वसंतक येतो)

वसंतक—अहो लोभाचार्य महाराज! तुमचा बेत फसला! ब-बुलाचार्य मरण पावले. (इतक्यात भद्रा येते)

भद्रा—काय? काय? ह्मणतां बब्बुलाचार्य मरण पावले? अहो ते आमचे जांवई होणार होतेना? कां महाराज झाली कां आपली हौस पूर्ण? पैशाच्या आशेनें माझ्या मुलीचा मात्र घात झाला असता (लोभाचार्य खालीं मान घालून उभा रहातो.)

वसंतक—(लोभाचार्या जवळ जाऊन) अहो, तुह्मी वयस्क झालां तुह्माला लाज कशी नाहीं वाटत? पैशाच्या लोभानें आपल्या एकुलत्या एक मुलीचा विवाह या थेरड्या बरोबर करून देणार होतां आणि आपल्या मुलीचा घात करणार होतां नाहीं? अहो या सार्वजनिक पुराणिकानें उपदेश केला इकडे लक्ष द्या! वासंतीचा व वसंताचा प्रीति विवाह झाला. आतां आपण स्वस्थ असा. चला प्रीति विवाह झालेल्या जोडप्यासह माधवोद्यानांत वसंतोत्सव सुरू आहे तेथें जाऊन आनंदोत्सव करूं (माधवोद्यानांत जातात)

(वसंत पूजा, पुराण नृत्य गायन सुरू आहे इतक्यांत वसंत वासंती.)

वसंत—

पद (वसंत त्रिवट)

वसंत महोत्सव शोभा पाहुनी ॥
प्रीति उपजे अंतःकरणी ॥ धृ० ॥
ऋतु वसंतीं पंच शरांचें,
पूजन इप्सित फल दे संतत,
जें जें इच्छिती युवजन तरुणी ॥ १ ॥

वासंती—

पद (वसंत त्रिवट)

गुलाल रंग नरनारी टाकिती ॥
रंग पिचकारी अमुप मारिती ॥ धृ० ॥
ढोल मृदंग ताल सुरानें
गाति होरी सुंदरी नाचति ॥
सुहृज्जनासह विनोद करिती ॥ १ ॥

वसंत—

पद (वसंत-त्रिवट)

बकुल चंपक केवर फुलले ॥
आम्र तरूही कुसुमित झाले ॥ धृ० ॥
मलयानिलही वाहूं लागले ॥
पुष्पें फुललीं परिमळ सुटले ॥ १ ॥

(वसंत व वासंती वसंत पूजा करतात. आरती पुराण नृत्य गायन आटोपल्यावर सर्व भरतवाक्य ह्मणतात.

पद (वसंत-दादरा)

ऋतु वसंत वासंतीस संतत दे वासंतिक सुख प-
संत गुणिवंत गातिसंत ॥ धृ० ॥ सरस आम्र
मंजीरी तिजवरी गुंजारव मधुकर करी मधुपाना
करिती तैं संतोषती ॥ लुसलुशीत कोमलमधु
कोरका भक्षिती करिती गान पीक शूक सुस्वर
अती ॥ कुसुमायुध कामदेव पूजन हें सुखकर
हो वासंतीसह वसंत, वासुदेव नारायण कवि
जनमन सुप्रसन्न संततहो ॥ १ ॥

अंक ४ था समाप्त.

